केंद्रशासित प्रदेशातील स्थानिक स्वराज्य संस्थेचे अध्ययन

: विषय संदर्भ दादरा नगर हवेली”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सामाजिकशास्त्रे विद्याशाखेअंतर्गत राज्यशास्त्र या विषयात पीएच.डी पदवीसाठी सादर करण्यात येणाऱ्या शोधप्रबंधाचा संशोधन आराखडा

संशोधन आराखडा

संशोधक

श्री डांगे किशोर पंढरीनाथ

प्रशिक्षित पदवीधर शिक्षक

गव्हर्नमेंट हायर सेकंडरी स्कूल टोकरखाडा, (इंग्रजी माध्यम)

सिल्वासा

दादरा आणि नगर हवेली

मार्गदर्शक

प्रा. डॉ. धुमाळे धोंडिराम कामाजी

शिवनेरी महाविदयालय , शिरूर अनंतपाळ

ता. शिरूर अनंतपाळ जिल्हा लातूर

प्रस्तावना :-

"केंद्रशासित प्रदेशातील स्थानिक स्वराज्य संस्थेचे अध्ययन : विषय संदर्भ दादरा नगर हवेली" हा विषय घेवून प्रस्तुत शोधनिबंधाची मांडणी करण्यात येणार आहे. भारतातील स्थानिक स्वराज्य संस्था या लोकशाही पद्धतीने राज्यकारभार कसा करावा याचे प्रशिक्षण देणाऱ्या शाळाच होय. भारतात मौर्य गुप्त इत्यादींच्या काळातही स्थानिक स्वराज्य संस्था अस्तिवात होत्या चोल राजांनी तर स्थानिक स्वराज्य संस्थाना विशेष उत्तेजन दिले होते. इसवी सन पूर्व तिसऱ्या शतकात भारतात आलेल्या मेगास्थेसीसने केलेल्या लिखाणात नगरप्रशासनाचे वर्णन आहे.

आधुनिक भारताच्या इतिहासात लॉर्ड रिपनने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या स्थापनेबाबत केलेले प्रयत्न व त्याने संमत केकेला सन १८८२ चा स्थानिक स्वराज्य संस्थांचा कायदा लक्षात घेता लॉर्ड रिपन यास यथार्थतेने स्थानिक स्वराज्य संस्थांचा जनक असे म्हटले जाते. १९१७ साली भारतीयांना स्थानिक स्वराज्य सामावून घेण्याचा प्रयत्न ब्रिटीशांनी केला. १९१९ सालच्या कायद्यानुसार भारतातील वेगवेगळ्या सात प्रांतांत पंचायतींचे कायदे पास झाले. देशातील प्रचलित पंचायत राज व्यवस्था १९५७ स्थापन झालेल्या बळवंतराव मेहता अभ्यास गटाच्या शिफाराशीवर अवलंबून आहे .या समितीने जिल्हा परिषद हा ग्राम विकासाचा आर्थिक केंद्रबिंदू सुचवीला होता. जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून भारताकडे पहिले जाते. स्वातंत्र्यानंतर जगभरातील अनेकांच्या मनात प्रश्नचिन्ह उभे होते कि सर्व लोकांचा भारतीय लोकशाहीत प्रत्यक्ष , अप्रत्यक्ष सहभाग असेल का ? आणि याचे उत्तर आहे होय . कारण भारतात १९५२ मध्ये राष्ट्रीय विस्तार सेवेची निर्मिती करून सामुहिक विकास कार्यक्रम राबविला त्यात लोकांच्या मागणीनुसार आणि यशस्वी सक्रियतेनुसार बदल केला गेला . आणि या नंतर स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नागरिकांचा प्रत्यक्ष होताना दिसतो . २२ आणि २३ डिसेंबर १९९२ रोजी झालेल्या ७३ आणि ७४ व्या घटनादुरुस्तीने स्थानिक स्वराज्य संस्थाना घटनात्मक दर्जा देऊन लोकशाहीची मुळे घट्ट रोवली गेली. त्यामुळे राजकारणाचे सामाजीकरण आणि राजकीय जागृती झाली हेच आपल्या लोकशाहीच्या यशाचे गमक आहे . १९८९ साली राजीव गांधींच्या पुढाकारातून ६४ व्या घटना दुरुस्ती विधेयाकांच्या निमित्ताने स्थानिक स्वशासन सक्षमीकारणाचा विचार लोकसभेत आला. पुढे १९९२ साली ७३ व ७४ वे घटना दुरुस्ती विधेयक संसदेत संमत झाले . याच विधेयका द्वारे भारतीय राज्य घटनेच्या नवव्या भागात कलम २४३ अंतर्भूत करण्यात आले त्या प्रमाणे संविधानात ११ वे आणि १२ वे परिशिष्ट जोडून त्यात नमूद राज्य सरकारकडून पंचायत राज व नागरी स्वशासन संस्थांकडे हस्तांतरित करावयाच्या अनुक्रमे २९ व १८ विषयांचा उल्लेख करण्यात आला . या घटना दुरुस्तीमुळे स्थानिक स्वशासन संस्थांचा कार्यकाल

५ वर्ष करण्यात आला तसेच निवडणुका बंधनकारक करण्यात आल्या .तसेच वंचित , शोषित व दुर्बल घटक मुख्य प्रवाहात घेण्याच्या दृष्टीने अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींना त्यांच्या लोकसंखेच्या प्रमाणात आणि महिलांसाठी किमान १/३ जागा राखीव ठेवण्यात आल्या . तसेच जिल्हा नियाजन समितीची स्थापना करण्यात आली .

******

विषय निवडीची भूमिका :

केंद्रशासित प्रदेशातील स्थानिक स्वराज्य संस्थेचे अध्ययन – विषय संदर्भ दादरा नगर हवेली हा विषय निवडीमागे प्रमुख भूमिका हि दादरा नगर हवेली आणि दमन आणि दिव या केंद्राशासित प्रदेशाला लाभलेला वैशिष्टपूर्ण सामाजिक आणि राजकीय वारसा अभ्यासाने हा आहे . तसेच दादरा नगर हवेली या जिल्हाच्या विकासात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या महत्वपूर्ण भूमिकेचा अभ्यास करणे हा आहे

संशोधन विषयाचे महत्व :-

स्वावलंबी- स्वयंशासित अशा सक्षम स्थानिक स्वराज्य संस्था निर्माण करणे हे महात्मा गांधींचे स्वप्न होते तसेच भारतासारख्या मोठ्या आणि अनेकार्थांनी विविधता असणाऱ्या देशात केंद्रित आणि लोकांपासून दूर असणारी कोणतीही शासन पद्धती भारताला हितावह असणार नाही याची गांधीजींना जाणीव होती . त्यामुळे त्यांनी खेड्यांकडे चला हा संदेश दिला कारण खेड्यांचा विकास झाला तरच भारताचा विकास होईल असे गांधीजीनी सांगितले. लोकशाही विकेंद्रीकरण म्हणजे लोकशाहीच्या तत्वांचा शासनाच्या शेवटच्या पातळीपर्यंतचा विस्तार करणे . भारतीय राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्वांचा अवलंब करून भारतात पूर्णपणे लोकशाहीचे विकेंद्रीकरण स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातून पूर्ण झाले आहे. देशातील स्थानिक स्वराज्य संस्था या पंचायत राज नावाने ओळखल्या जातात

संशोधांची उद्दिष्टे :-

"केंद्रशासित प्रदेशातील स्थानिक स्वराज्य संस्थेचे अध्ययन : विषय संदर्भ दादरा नगर हवेली" या विषयावर अध्ययन सर्वव्यापी व सर्वस्पर्श होऊन संशोधनाला निश्चित दिशा प्राप्त करून देण्यासाठी संशोधनाची खालील उद्दिष्टे ठेवण्यात आली आहे.

१. दादरा नगर हवेली च्या विकासावर स्थानिक स्वराज्य संस्थांचा असलेला प्रभाव स्पष्ट करणे आणि इतर अभ्यासकांना , संशोधकाना तसेच विध्यार्थ्यांना पूरक व मार्गदर्शक ठरेल अशी माहिती संकलित करण्याचा प्रयत्न करणे .
२. दादरा नगर हवेलीतील स्थानिक नेतृत्वाचे आणि त्याच्या द्वारे झालेल्या विकासाचे अवलोकन करणे .
३. दादरा नगर हवेलीतील स्थानिक स्वराज्य संस्थेतील प्रशासकीय अधिकाऱ्यांचे योगदान अभ्यासने .
४. दादरा नगर हवेलीचा ऐतिहासिक मागोवा घेणे.

५. एकूणच संघप्रदेश दादरा नगर हवेलीच्या विकासाचा तटस्थपणे , नि:स्पृहपणे आढावा घेणे.

संशोधन पद्धतीचे गृहीतके :-

"केंद्रशासित प्रदेशातील स्थानिक स्वराज्य संस्थेचे अध्ययन : विषय संदर्भ दादरा नगर हवेली" या विषयावर प्राथमिक अभ्यासाच्या अवलोकनातून पुढील गृहीतक्यांचा अभ्यास करण्यात येईल

१. दादरा नगर हवेली मध्ये लोकशाहीचे विकेंद्रीकरण यशस्वी झाले आहे
२. दादरा नगर हवेलीच्या विकासात येथील जिल्हा पंचायत महत्वाची भूमिका निभावते
३. दादरा नगर हवेलीच्या जिल्हा पंचायात मध्ये मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे योगदान अमुलाग्र आहे
४. दादरा नगर हवेली मधील जनमानसावर येथील स्थानिक स्वराज्य संस्थेचा प्रभाव आढळतो

संशोधांचे क्षेत्र / मर्यादा :-

प्रस्तुत संशोधनाचे क्षेत्र दादरा नगर हवेली आणि दमन आणि दिव या केंद्र शासित प्रदेशातील दादरा नगर हवेली जिल्हातील स्थानिक स्वराज्य संस्थेचा अभ्यास करणे हे आहे .

प्रस्तुत प्रबंधाची मांडणी करताना संशोधकाने दादरा नगर हवेली आणि दमन आणि दिव या संपूर्ण प्रदेशाचा आढावा घेणार असला तरी संशोधकाचा गाभा दादरा नगर हवेलीतील स्थानिक स्वराज्य संस्थेचा अध्ययन करणे हाच आहे

सदर संशोधनासाठी संशोधकाने २०१० ते २०२० या दहा वर्षांचा कालावधी निवडला आहे. याच कालावधीतील विशेष मागोवा घेतला जाईल.

*****

प्रकरण १ ले

प्रस्तावना :

प्रस्तावनेच्या पहिल्या प्रकरणात संशोधन पद्धतीची मांडणी करून विषय प्रवेश, संशोधकाची विषय निवडी मागची भूमिका, अध्ययनाचे महत्व त्यासाठी स्वीकारण्यात आलेली उदिष्टे आणि अध्ययनाचे काही पैलू निश्चित करून संशोधनाची व्याप्ती निश्चित केली जाईल.

प्रकरण २ रे

दादरा नगर हवेली जिल्हाचा इतिहास:

या शोध प्रबंधाच्या दुसऱ्या प्रकरणात दादरा नगर हवेली चा मध्ययुगीन आणि आधुनिक इतिहासाचा मागोवा घेतला जाईल आणि या इतिहासाचा वर्तमान स्थितीत जनमानसावर सामाजिक आणि राजकीय कसा प्रभाव पडला आहे याचा आढावा घेतला जाईल

प्रकरण ३ रे

दादरा नगर हवेली आणि दमन आणि दिव या संपूर्ण संघप्रदेशाची थोडक्यात माहिति

:- २६ जानेवारी २०२० या दिनी १. दादरा आणि नगर हवेली २. दमण आणि दिव हे केंद्राशासित प्रदेश एकमेकांत विलीन झाले . या कारणामुळे या संपूर्ण प्रदेशाचा आढावा घेणे क्रमप्राप्त ठरेल .या मुळे या संपूर्ण प्रदेशातील तिन्ही जिल्हांतील पंचायत राज चा थोड्क्यात आढावा या प्रकरणात घेतला जाईल.

प्रकरण ४ थे

दादरा नगर हवेलीतील जिल्हा पंचायतीची रचना आणि कार्याधिकार

:- दादरा नगर हवेली मध्ये द्विस्तर पंचायत राज व्यवस्था आहे या शोध प्रबंधाच्या चौथ्या प्रकरणात जिल्हा पंचायत या स्तराची रचना अभ्यासली जाईल. तसेच या स्तरावरील कार्यधिकार हि अभ्यासले जातील .

प्रकरण ५ वे

जिल्हा पंचायत अध्यक्षांचे योगदान

:- या शोध प्रबंधाच्या पाचव्या प्रकरणात अध्यक्षांचे दादरा नगर हवेलीच्या २०१० ते २०२० या कालावधीतील सर्व जिल्हा पंचायत योगदान अभ्यासले जाईल

प्रकरण ६ वे

मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे योगदान

:- शोध प्रबंधाच्या सहाव्या प्रकरणात दादरा नगर हवेलीच्या २०१० ते २०२० या कालावधीत झालेल्या सर्व मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे योगदान अभ्यासले जाईल

प्रकरण ७ वे

निष्कर्ष

हे या संशोधन प्रबंधाचे शेवटचे प्रकरण आहे. संशोधन अहवालाच्या या प्रकरणात एक ते सहा प्रकरणांच्या आधारे अभ्यासंती जे निष्कर्ष हाती येतील त्यांचा मागोवा घेण्यात येणार आहे . प्रामुख्याने संशोधनाची दिशा ठरवण्यासाठी मांडण्यात आलेल्या गृहितकृत्यांची सिद्धता असिद्धाता हि तपासण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

परिशिष्ट:-

मुलाखत

फोटो

*संदर्भग्रंथे:- १. पंचायत राज (लेखक - कुलदीप माथुर)

२. पंचायत राज एंड रुरल डे डेवलपमेंट (लेखक - पी. सी. सिक्लीगर)

३. भारत कि राजव्यवस्था (लेखक - एम लक्ष्मीकांत)

४. रुरल डेवलपमेंट इन इंडिया (लेखक - के. आर . गुप्ता)

५. पंचायती राज (एम अस्लम)

मासिके व नियतकालिके १. लोकराज्य मासिक

२. कुरुक्षेत्र

संशोधक

श्री डांगे किशोर पंढरीनाथ
प्रशिक्षित पदवीधर शिक्षक
(इंग्रजी माध्यम)
सिल्वासा दादरा आणि नगर हवेली

मार्गदर्शक

प्रा. डॉ. धुमाळे धोंडिराम कामाजी
शिवनेरी महाविदयालय, शिरूर अनंतपाळ
गव्हर्नमेंट हायर सेकंडरी स्कूल टोकरखाडा,
ता. शिरूर अनंतपाळ जिल्हा लातूर